**प्रेसनोट प्रसिध्दीसाठी**

**महामेट्रो व विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांची संयुक्त बैठक.**

महामेट्रो व विभागीय रेल्व व्यवस्थापक यांची समन्वय बैठक दि.24.07.2018 रोजी पार पडली. या बैठकीत पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड शहरात सुरु असलेल्या मेट्रो प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. प्रस्तूत सादरीकरणामध्ये अनुक्रमे मेट्रो स्टेशनचे एंट्री एक्झीट व वाहनतळाकरिता लागणाऱ्या जागेचे संपादण करणे, रेल्वे क्रॉसींग कुठे व कशाप्रकारे करणार तसेच मेट्रो व रेल्वे यांचे एकीकरण या विषयावर प्रामुख्याने सविस्तर चर्चा झाली.

कासारवाडी/(नाशिकफाटा), खडकी, शिवाजीनगर, आर.टी.ओ, पुणे रेल्वे इ. स्थानकावर मेट्रो व रेल्वे यांची प्रवाश्यांसाठी ये जा करण्याचे या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कासरवाडी आणि खडकी रेल्वे स्थानकाच्या फलाटावर मेट्रो स्टेशनचे एंट्री/ एक्झीट प्रवाशांच्या सोयीसाठी घेण्यात येणार आहे. शिवाजीनगर रेल्वे स्थानक प्रवासी भुयारी मार्गाव्दारे मेट्रो भुयारी स्थानकास जोडण्यात येईल. पुणे रेल्वे स्थानकावर रेल्वे पादचारी पुल- उन्नत मेट्रो स्थानकाला जोडण्यात येईल. वर खडकी स्थानकाच्या ७00 मी. दक्षिणेला मेट्रोची मार्गीका क्र.1 रेल्वेला उन्नत मार्गाने छेदून जाते. तसेच मार्गिका क्र.2 संगमपुलाच्या पश्चिमेला रेल्वे मार्गाला उन्नत पध्दतीने छेदून जाते. तसेच खडकी स्थानकाच्या उत्तरेला रेल्वेची ११० के.व्ही उच्चदाब विदयुत वाहिनी स्थलांतरीत करणे नियोजित आहे.

या सर्व विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली. या बैठकीसाठी रेल्वेतर्फे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री.मिलींद देऊस्कर, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री.प्रफुल चंद्रा, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय), श्री. सुरेश पाखरे, वरीष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री.कृष्णकांत पाटील तसेच महामेट्रोतर्फे मुख्य प्रकल्प व्यवस्थापक श्री.गौतम बिऱ्हाडे व इतर वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. रेल्वेच्या वतीने श्री. देऊस्कर यांनी मेट्रो प्रकल्पासाठी सर्वोतोपरी सहाकार्य करण्याचे मान्य करुन यासंदर्भात वेळावेळी समन्वय बैठका आयोजित करुन कामाचा आढावा घेण्याचे मान्य केले.